# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ) राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन विभाग)

जा.क्र./गो.वि./महा.वि./ ९४८ /२०१७ दिनांक : ८/०९/२०१७

परिपत्रक २

विषय :– निरंतर संलग्निकरण प्रस्ताव विलंब शुल्कासहीत विद्यापीठात सादर करण्याबाबत.
संदर्भ :– वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र.गों.वि.ग/विलेवि/५०८/२०१७
दि. १४/०६/२०१७

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१८–१९ चे ऑनलाईन निरंतर संलग्निकरण प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत देण्यात आलेली होती. परंतु ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक सत्र २०१८–१९ करिता ऑनलाईन निरंतर संलग्निकरण प्रस्ताव विद्यापीठात सादर केलेले नाही. अशा महाविद्यालयांना अंतिम संधी म्हणून दि. १५ सप्टेंबर, २०१७ पर्यंतच लिंक सुरू करून देण्यात येत आहे. संदर्भिय परिपत्रकाप्रमाणे दि. ३१/०८/२०१७ नंतरच्या प्राप्त प्रस्तावावर विलंब शुल्क नियमानुसार आकारण्यात येईल. वाढीव मुदतीनंतर प्रस्ताव कुठल्याही परिस्थितीत विद्यापीठाकडून स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पुढील सत्रापासून नियमितपणे सर्व संलग्नित महाविद्यालयांनी विद्यापीठात ३१ ऑगस्ट पर्यंत निरंतर संलग्निकरण प्रस्ताव सादर करावे. यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

मा.प्र.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

(श्री दिपक जुनघरे)
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहीतीकरिता व कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
३. मा. वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
४. मा. संचालक, मुल्यमापन व परिक्षा मंडळ, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
५. संगणक विभाग गोंडवानाविद्यापीठ गडचिरोली.

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली –४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२२३१०८संगणक विभाग,२१६५९४म.वि.E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com